सहायकपोलीसआयुक्त, वाहतुक विभाग अमरावतीशहर
ITI कॉलेज समोर,मोर्शी रोड,अम.फोन क्र. 0721- 2660330
E-mail- acptraffic.cpamt@mahapolice.gov.in

दिनांक :- 03/01/2025

जा.क. सपोआ (वा)/प्रेस नोट /2025

## प्रेस नोट

पोलीस वर्धापन सप्ताह निमीत्त मा.श्री.नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर, मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त मुख्यालय,अमरावती शहर, श्री गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ1), श्री सागर पाटील, पोलीस उपायुक्त (परिमंडळ2) अमरावती शहर यांचे संकल्पनेतुन पोलीस दलाच्या कामकाज, रस्ते सुरक्षा व वाहतुक नियम सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याच्या उददेशाने रेझिंग डे निमीत्त शनिवार दिनांक 04/01/2024 रोजी सकाळी 09.30 वा. भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅली ची सुरवात पोलीस मुख्यालय कवायत मैदान अमरावती शहर येथुन होवुन रॅली सुंदरलाल चौक, चपराशी पुरा चौक- बियाणी चौक - वेलकम टी पॉइंट - पंचवटी चौक - शेगाव नाका चौक - गाडगेनगर - बाबा कॉर्नर - ट्रॉफीक ऑफीस - इर्विन चौक - मा. पोलीस आयुक्त कार्यालय पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथे समाप्त होणार आहे.

जनजागृती रॅली मध्ये ट्रॅफीक अधिकारी/अंमलदार हे हेल्मेट परिधान करुन रॅली मध्ये सहभागी होणार आहे. त्यासोबतच रॅलीमध्ये पोलीस पत्नी व सामाजिक सुरक्षा संस्थेच्या महिला,विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिक, श्वान पथक, दामिणी पथक, आर.सी.पी.स्कॉड, क्यु.आर.टी.स्कॉड, यमराज ओपन जिप्सी मध्ये, डायल 112 वाहन, सायबर व्हॅन, इंटरसेप्टर मोबाईल, वरुण वाहन, वज्र वाहन यांचा समावेश राहणार आहे.

सदर बाईक रॅलीचा उददेश सर्वसामान्य नागरिक,विद्यार्थी यांना पोलीस विभागाच्या कामकाजाबाबत सखोल माहिती देणे, तसेच अपघातामुळे होणारी जिवीत हानी, मानसिक त्रास व आर्थिक नुकसान टाळण्याकरीता हेल्मेट व सिटबेल्टचा वापर करुन रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने वाहतुक नियमांचे महत्व सर्वसामान्य नागरिकांना पटवुन देणे हे आहे.

( संजय खताळे )
सहायक पोलीस आयुक्त
वाहतुक विभाग अमरावती शहर

प्रती :- मा.संपादक, --------------

सदर प्रेसनोट जनहितार्थ असल्याने आपले वर्तमान पत्रात प्रकाशित करुन सहकार्य करावे.